## -: प्रेसनोट दिनांक - १९/०१/२०२६ :-

**आरोपी लोकसेवक प्रदिप पांडुरंग देसाई, वय - ३२ वर्षे, पद - नगर अभियंता (स्थापत्य), मुरगुड नगरपरिषद मुरगुड, ता. कागल, जि.कोल्हापूर तात्कालीन नेमणुक नगर अभियंता हुपरी नगरपरिषद हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, रा. मिणचे खुर्द, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत.......**

---

तक्रारदार हे स्वत: काँट्रॅक्टर असून त्यांनी हुपरी नगरपरिषद अंतर्गत कामे पूर्ण केलेली आहेत. त्या कामाची एम.बी. रजिस्टर पूर्ण करून देण्याच्या मोबदल्यात, हुपरी नगरपरिषदेचे तत्कालीन नगर अभियंता प्रदीप पांडुरंग देसाई यांनी तक्रारदार यांचेकडे यापुर्वी ५० हजार रूपये लाच घेतली असुन तक्रारदार यांच्याकडे त्यांनी आणखीन १ लाख ५० हजार रुपयांची मागणी केली आहे म्हणुन तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये तक्रारदार यांचेकडे प्रदीप पांडुरंग देसाई यांनी तक्रारदार यांचे काम पुर्ण करून देणेसाठी तक्रारदार यांचेकडे एकुण १ लाख ५० हजारांची मागणी करून तडजोडी अंती १ लाख ३० हजार रुपये मागणी केली. त्यापैकी यापुर्वी ५० हजार स्वीकारलेचे मान्य करून राहीलेल्या ८० हजारामध्ये आता तक्रारदार यांच्याकडे पहिला हप्ता म्हणून ४० हजार रूपये लाची मागणी केली तसेच राहीलेले ४० हजार रूपये लाच एम.बी रजिस्टर पूर्ण झाल्यावर घेणेचे मान्य केलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता, पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक प्रदिप पांडुरंग देसाई, पद - नगर अभियंता (स्थापत्य), मुरगुड नगरपरिषद मुरगुड, ता. कागल, जि. कोल्हापूर तात्कालीन नेमणुक नगर अभियंता हुपरी नगरपरिषद हुपरी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी ४०,०००/- रूपये लाच स्विकारलेने, त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक **आरोपी लोकसेवक प्रदिप पांडुरंग देसाई, वय - ३२ वर्षे, पद - नगर अभियंता (स्थापत्य), मुरगुड नगरपरिषद मुरगुड, ता. कागल, जि.कोल्हापूर तात्कालीन नेमणुक नगर अभियंता हुपरी नगरपरिषद हुपरी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर** यांचेविरूध्द मुरगुड पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार, श्री राजेंद्र सानप पोलीस निरीक्षक, अतिरिक्त कार्यभार पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि.कोल्हापूर पो.हे.कॉ. संदिप काशीद, पो.हे.कॉ. सुधिर पाटील, पो.कॉ. कृष्णा पाटील, चा.पो.कॉ. प्रशांत दावणे ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर
मो.नं. ९७६४१४०७७७. ९४०४३२१०६४ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.